१४

# सामाजिक स्वास्थ आणि त्यासमोरील आव्हाने

**प्रा.प्रसाद शांताराम गुरव**
सहाय्यक प्राध्यापक, एन.एस.एस कॉलेज ऑफ एज्युकेशन, ताडदेव

**सारांश**

२१ वे शतक हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञान तंत्रज्ञानाबरोबर माणसाच्या गरजाही वाढल्या. माणसाच्या जीवन पद्धतीमध्ये अनेक स्थित्यंतरे आली.या बदलामध्ये मनुष्य पारंपारीक विचारसरणी सोडून अधिकाधिक भौतिकवादी होऊ लागला यातच पराकोटीच्या वैयक्तीक स्वार्थामुळे मनुष्य अधिकाधिक विवेकशून्य बनला यामध्ये तो स्वतःच्या वैयक्तिक स्वास्थाबरोबर सामाजिक स्वास्थही हरवून बसला.

आज विघडलेल्या जागतिक सामाजिक स्वास्थाचा विचार जगातील सर्वच स्तरावर केला जात आहे. भारत त्याला अपवाद नाही. भारतीय सामाजिक स्वास्थ म्हणजे एक नाजूक विषय आहे. अठरा पगड जाती, अनेक भाषा, विविध संस्कृती या वरवर दिसणाऱ्या विविधतेतील एकतेला एक असंतोषाची सुप्त किनार आहे. हा असंतोष कोणत्याना कोणत्या स्वरूपात बाहेर पडत आसतो उदा. पटेल आरक्षण गुजरात.

भारतीय सामाजिक स्वास्थाच्या दिशेने पहिले संवैधानिक पाऊल भारतात २६ जानेवारी १९५० पासून झालेली संविधानाची अंमलबजावणी होय. त्यामुळे घटनात्मक समानता निर्माण झाली परंतु सामाजिक, आर्थिक समानता प्रगती फारशी झाली नाही त्यातूनच समाजात विविध वर्ग व जातीवर आधारीत स्तरीकरण घडून आले. समजिक स्वास्थासमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या. उदा. भ्रष्टाचार, आतंकवाद , दहशतवाद व्यभिचार, व्यसनाधिनता, भोगवादी वृत्ती इत्यादी अपप्रवृत्तीत वाढ होतांना दिसते अशा स्थितीमध्ये सामाजिक स्वास्थाकडे आज गांभिर्याने पहाण्याची व त्यावर योग्य उपाययाजनेची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**सामाजिक स्वास्थ**

ज्या नागरिकांनी समाज बनवलेला आहे त्या समाजातील प्रत्येक नागकिला स्वतःच्या विकासासाठी संधी देऊन सामाजिक विकास प्रक्रियेमध्ये त्यांच्या योगदानास पोषक वातावरण म्हणजे सामाजिक स्वास्थ होय. सामाजिक स्वास्थ लाभलेल्या समाजामध्ये सर्व नियम व कायदे समाजातील प्रेत्यक घटकास समान असतात. समाजाची संपत्ती समाजातील घटकांनी ती निर्मितीसाठी केलेल्या येगदानावर वितरीत झालेली असते समाजाच्या प्रत्येक घटकाला समाजाच्या सार्वजनिक निर्णयात सहभागी होण्याची हमी असते. समाजाच्या प्रत्येक घटकाला निर्णय प्रक्रियेत सहभागी केलेले असते. सामाजिक स्वास्थ असलेल्या समाजाची काही वैशिष्टये भारतीय राज्यघटनेनुसार सांगता येतील.

१. स्वातंत्र्य, समता व बंधूता २. संविधानाची श्रेष्ठता ३. कायद्याचं राज्य ४. धर्मनिरपेक्षता ५. प्रजासत्ताक पद्धतीची शासन व्यवस्था ६. मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे ७. न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य ८. लोकशाही तत्त्वावर आधारित समाजव्यवस्था आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मिती आदेश इत्यादी.

**सामाजिक स्वास्थासमोरील आव्हानेः**

सामजिक स्वास्थामध्ये विशेषतः व्यक्तीच्या मुलभूत गरजा, मूलभूत गरजांची पूर्तता, शारीरिक व मानसिक आरोग्य राहणीमानाचा दर्जा शिक्षण प्रदूषविरहित पर्यावरण विविध गरजांची पूर्तता करमणूकीची साधने इ. चा समावेश होतो. परंतु या अपेक्षाची पुर्तता करत असतांना अनेक आव्हाने उभी राहीली ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **निरक्षरताः** निरक्षरता हा समाजिक स्वास्थाचा सर्वात पहिला शत्रू आहे त्याची कटू फळे आपल्या अनेक पीढया अनुभवत आल्या आहेत कारण शिक्षणामुळे माणुस विचार करायला लागतो आणि जेथे शिक्षण थांबते तिथे विचार थांबतो मग सुरू होते गुलामगिरी भारतातील बहुसंख्य वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.

२. **शिक्षणाचा दुरूपयोगः** शिक्षणाने माणूस शहाणा होतो. परंतू आज काही उच्चशिक्षित तरूण दहशतवादाची साथ देतांना दिसतात. उच्चविद्याविभूषित लोक भ्रष्टाचार करतांना दरोडे घालतांना दिसतात.

३. **समाजाघातक विचार** ः चांगल्या विचारांच्या पेरणी केली तर चागंला समाज निर्माण होईल कोणताही संघर्ष विचाराने सोडविता येतो. परंतु आज एखादा विचार संपविण्यासाठी बंदूकीचा वापर केला जातो हे दूर्देवी आहे. उदा. दाभोळकर, पानसरे आणि प्रा. कलबर्गी याची हत्या.

४. **भोगवादी विचारसणीः** सर्वकाही भौतिक सुखासाठी या न्यायाने मिळेल त्या वैध अवैध मार्गानी लोक संपत्ती ओरबाडतांना दिसतात. संपत्तीचे ओंगळवाने दर्शन जागोजागी घडतांना दिसते भौतिक सुखासाठी आज आई आपल्या मुंलाची सहज हत्या करू शकते उदा. शीना बोरा हत्याकांड

५. **ढोंगीबाबांचे वाढते प्रस्थः** तुकाराम व ज्ञानेश्वरांसारख्या अनेक महान संतानी समाजातिल दाभिंकतेवर टिका केली समाजाला चांगल्या वाईट गोष्टी सहज सोप्या भाषेत समजाऊन सांगितल्या पण आज धर्माच्या नावावर अनेक चाणांक्ष लोकांनी आपली दुकाने थाटून अन्याय अत्याचार व प्रतिकूल परिस्थितीने मानसिकदृष्टया खचलेल्या समाजाला लुबाडायला सुरूवात केली आहे.

६. **संस्कारांचा ऱ्हास** ः जागतीकीकणाच्या रेटयात बऱ्यावाईट गोष्टीपैकी एक म्हणजे संस्कार आणि संस्कृतीचा ऱ्हास होय. देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेणाऱ्याने एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे या ओळी काव्यापूरताच मर्यादित राहिल्यात का अशी शंका येते



Vol: 4th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Oct. 2015,ISSN : 2319-5525

७. **समाजिक भानाचा आभावः** आज समाजात अनेक प्रश्न आहेत परंतु याकडे गांभिर्याने पहायला कोणाला वेळ नाही प्रत्येक व्यक्ति अधिकाधिक व्यक्तिकेंद्री झाली आहे उदा. आपल्या देशात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या मूलभूत गरजांपासूनही काही लोक वंचीत आहेत. तर काही विलासी आयुष्य जगत आहेत.

८. **अध्यात्मिक पैलूचा अभाव ः** आत्मा आणि परमेश्वर यातील नाते म्हणजे अध्यात्म त्यासाठी सर्वच धर्मांचे ग्रंथ उपयुक्त आहेत. परमेश्वर प्राप्तीचे सदूमार्ग त्यात सांगितले आहेत. परंतु आपणाला उपयुक्त असा भाग धर्मग्रंथातून उचलून आपल्या सोयीनुसार तो लोकांना सांगुन त्यांना खऱ्या अध्यात्मिक सुखापासून दूर ठेवले जाते.

९. **भावनिक अस्थिताः** आधुनिकीकरणाबरोबर संयुक्त कुटंब पद्धतीचा ऱ्हास झाला व विभक्त कुटुंब जन्माला आली. त्यामुळे वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आईवडीलांना कामासाठी बाहेर पडावे लागले. परिणामतः मुलांवर संस्कार करायला करायला आईवडिलांना वेळ नाही. शिक्षक हाच संस्कारांचा पुरवठा करणारा एकमेव दुकानदार आहे असा समज समाजात वेगाने पसरत आहे. यातून नवीन पीढी भावनिक अस्थिरतेकडे जात आहे. युवा पीढीतील व्यसनाचे व हिंसेचे प्रमाण वाढत आहे.

१०. **सभोवतालचे वातावरणः** मनुष्याला जगण्यासाठी चांगल्या पर्यावरणाबरोबर चांगल्या सामाजिक वातावरणाचीही गरज असते. आज दोन्ही बाबतीत सर्वसामान्य माणूस असमाधानी आहे. कारण मुठभर लोकांच्या हातात एकवटलेली सत्ता आणि त्यातून होणारी पर्यावरणाची लूट व सतत असुरक्षिततेची भावना असे प्रतिकूल वातावरण आज सामान्य व्यक्तींच्या भोवती आहे.

११. **जागतिक असंतोष ः** 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजे हे विश्वची माझे घर ही भावना आज लयास गेलेली दिसते. आज प्रत्येक देश आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी दुसऱ्या देशाला लुबाडायला अथवा साम्राज्य गाजवायला निघाला आहे. कोणाला महासत्ता व्हायचं आहे. कोणाला आपलं महासत्तापद टिकवायचं आहे. दुसरीकडे गरिब देशातील जनतेला दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे.

**चांगल्या सामाजिक स्वास्थासाठी**

१. शिक्षणाचा प्रसार २. मुल्याधारीत शिक्षण ३. जीवनाकडे पहाण्याचा सकारात्मक दुष्टीकोन ४. जीवनकौशल्यांचा विकास ५. लोकशाहिचे शिक्षण ६. संविधानाची ओलख ७. सांस्कृतीक प्रबोधन व संक्रमण ८. धार्मिक व नैतिक शिक्षण ९. संवेदनशीलता१०. धर्मनिरपेक्षता ११. विज्ञाननिष्ठा १२. लोकसंख्या नियंत्रण १३. विश्ववंधूत्त्व १४. पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण

एकंदरीत सामाजिक स्वास्थचा विचार करता व्यक्तीचे मन हे समाजमनाचे प्रतिबिंब आहे. व्यक्ती ही समाजात जन्माला येते आणि समाजातच तिचा शेवट होतो. त्यामुळे व्यक्ती म्हणून प्रत्येकाने आपला जीवनप्रवास सुखकर होण्यासाठी सामाजिक योगदान देणे आवश्यक आहे. कारण सामाजिक स्वास्थ व वैयक्तिक स्वास्थ या परस्पर पुरक गोष्टी आहेत यांचे भान प्रत्येकाने ठेवायला हवे.



Vol: 4th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Oct. 2015,ISSN : 2319-5525

**संदर्भसूची**

१. देशपांडे के ना. माळी आ.ल., 'भारतीय शिक्षणातील इतिहास', (दुसरी आवृत्ती) नित्य नूतन प्रकाशन, पुणे, जुलै २००७

२. तापकीा द. तापकीर नि. लोंढ गौ. शिक्षण प्रणालीचे अधिष्टान व व्यवस्थापन संघमित्रा प्रकाशन मिरज १४ एप्रिल २०१०

३. दुनाखे अ. 'उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक, (दुसरी आवृंत्ती) नित्य नूतन प्रकाशन पुणे सप्टेंबर २००८

४. करंदिकर सु. शैक्षणिक मानसाशास्त्र (सहावी आवृत्ती) फडके प्रकाशन कोल्हापूर जून २००६

...